| | |
|---|---|
| MHSN080012632019 | दाखल तारीख – ०५.१०.२०१९<br>नोंदणी तारीख – ०५.१०.२०१९<br>निकाल तारीख – ०७.०३.२०२६<br>कालावधी – वर्षे – महिने – दिवस<br>०६ ०५ ०२ |

**जत येथील न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांचे न्यायालय,**
**(पिठासीन अधिकारी प्रकाश चु. बछले)**

**नियमित फौजदारी खटला क्र.२५५/२०१९**
**निशाणी क्र.**

| | | |
|---|---|---|
| अभियोग पक्ष | | **महाराष्ट्र शासन तर्फे**<br>पोलीस ठाणे अधिकारी,<br>जत पोलीस ठाणे. |
| अभियोग पक्षातर्फे | | श्री. अ. व. विरकर<br>सहाय्यक सरकारी अभियोक्ता |
| | | |
| आरोपी | **१.**<br><br>**२.**<br><br>**३.** | **राजू मारुती कोळी,**<br>वय–२७ वर्षे, व्यवसाय – शेती,<br>**अनिल मारुती कोळी,**<br>वय–२४ वर्षे, व्यवसाय – शेती,<br>**सोमान्ना मारुती कोळी,**<br>वय–३२ वर्षे, व्यवसाय – शेती,<br>सर्व रा. येळदरी, ता. जत, जि. सांगली. |
| आरोपीतर्फे वकील | | श्री. एस. जी. माळी. |

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडलेचा दिनांक | – | ०१.११.२०१८ |
| गुन्हा रजिस्टर क्रमांक | – | ८९/२०१९ |

| | | |
|---|---|---|
| फिर्याद दाखल दिनांक | – | ०२.०५.२०१९ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल दिनांक | – | ०५.१०.२०१९ |
| दोषारोप ठेवलेचा दिनांक | – | ०९.०७.२०२५ |
| साक्षीपुरावा सुरु झालेचा दिनांक | – | २७.०२.२०२६ |
| युक्तिवाद दिनांक | – | ०७.०३.२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | – | ०७.०३.२०२६ |
| दोषसिध्दी व शिक्षेबाबत आदेश | – | –––– |

## <u>आरोपीची माहिती</u>

| अ. क्र. | आरोपीचे नांव | आरोपीस अटक दिनांक | आरोपीस जामिनावर खुले केलेचा दिनांक | दोषारोपातील कलम | आरोपीस दोषमुक्त किंवा दोषसिध्द केले | आरोपीस झालेली शिक्षा | फौ.प्र. सं.कलम ४२८ नुसार आरोपीने संपरिक्षे दरम्यान भोगलेली शिक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | राजू मारुती कोळी | ०५.११.२०१८ | ०६.११.२०१८ | भा.दं.वि.स. कलम ३२६, ३२३, ५०४ सह ३४ अन्वये. | निर्दोष मुक्तता | –– | –– |
| २. | अनिल मारुती कोळी | ०५.११.२०१८ | ०६.११.२०१८ | भा.दं.वि.स. कलम ३२६, ३२३, ५०४ सह ३४ अन्वये. | निर्दोष मुक्तता | –– | –– |
| ३. | सोमान्ना | ०५.११. | ०६.११. | भा.दं.वि.स. कलम | निर्दोष मुक्तता | –– | –– |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | मारुती कोळी | २०१८ | २०१८ | ३२६,३२३, ५०४,सह ३४ अन्वये. | | | |

**भाग क**

**अभियोगपक्ष/बचावपक्ष/न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

**अ. अभियोगपक्ष :**

| अ नं. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| P.W.1 | बाळगोंडा भुताळी कोळी | फिर्यादी तथा प्रत्यक्षदर्शी जखमी साक्षीदार |
| P.W.2 | बसगोंडा भुताळी कोळी | साक्षीदार |

**ब. बचावपक्षाचे साक्षीदार, असेल तर**

| अ नं. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| -- | – | – |

**क. न्यायालयीन साक्षीदार, असेल तर**

| अ नं. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| – | – | – |

**अभियोगपक्ष/ बचावपक्ष/न्यायालयीन निशाणी क्रमांकाची यादी**

**अ. अभियोगपक्ष**

| **अ नं.** | **निशाणी क्र.** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | – | – |

**ब. बचाव**

| **अ नं.** | **निशाणी क्र.** | **वर्णन** |
|---|---|---|
| --- | -- | -- |

**क.न्यायालयीन निशाणी**

| अ नं. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| | | |

**ड. भौतिक वस्तु**

| अ नं. | वस्तु क्र. | वर्णन |
|---|---|---|
| --- | -- | -- |

## न्या य नि र्ण य
## (घोषित दिनांक ०७.०३.२०२६)

आरोपी विरुध्द भारतीय दंड संहिता १८६० (येथून पुढे संक्षिप्तपणे भा.द.वि. असे संबोधण्यात येईल) चे कलम ३२६,३२३,५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचा दोषारोप आहे.

**अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात पुढीलप्रमाणे –**

२. फिर्यादी बाळगोंडा भुताळी कोळी हे मौजे येळदरी, ता. जत येथील रहिवाशी असून तेथे ते त्यांच्या कुटुंबासमवेत राहतात. आरोपी क्र.१ ते ३ हे फिर्यादी यांच्या गावात राहणेस असून त्यांची शेती फिर्यादी यांच्या शेतलगत आहे. फिर्यादी व आरापी यांचेमध्ये शेतीच्या कारणावरुन वाद होते. दिनांक ०१.११.२०१८ रोजी सकाळी ०७.०० वा. चे सुमारास फिर्यादी, त्यांचा भाउ बसगोंडा व सिध्दू आण्णाप्पा चौगुले असे मिळून फिर्यादी यांच्या शेतात ताडपत्रीवर मका वाळत घालत होते. सदर ताडपत्रीचा काही भाग आरोपी यांच्या शेतात गेला होता. त्यावेळी ०७.३० वा. चे सुमारास आरोपी क्र.१ ते ३ हे, आमच्या शेतात मका का वाळत घातला आहे असे म्हणत शिवीगाळ करत तेथे आले. आरोपी क्र.१ यांच्या हातात कुऱ्हाड तर आरोपी क्र.३ यांच्या हातात काठी होती. आरोपी क्र.२ यांनी फिर्यादीच्या भावास लाथाबुक्क्यांनी मारहाण करणेस सुरुवात केली. आरोपी क्र.१ यांनी त्यांच्या हातातील कुऱ्हाडीने फिर्यादीच्या उजव्या डोळयाजवळ मारले. तर आरोपी क्र.३ यांनी काठीने फिर्यादीच्या डाव्या हाताचे बोटावर मारले. त्यामुळे,

फिर्यादी गंभीर जखमी झाले व त्यांच्या उजव्या डोळयाजवळून रक्त येवू लागले. सिध्दू चौगुले यांनी भांडण सोडविले. आरोपी तेथून निघून गेले. त्यानंतर फिर्यादी हे तक्रार देणेकरिता जत पोलीस ठाणेत गेले असता तेथून त्यांना मेडीकल यादी देवून उपचाराकरिता ग्रामीण रुग्णालय, जत येथे पाठविण्यात आले. तेथे प्राथमिक उपचार घेतल्यानंतर पुढील उपचाराकरिता मिरज सिव्हील हॉस्पीटल येथे पाठविण्यात आले. तेथील उपचारानंतर फिर्यादी यांनी जत पोलीस ठाणे येथे तक्रार दिली. म्हणून आरोपी विरुध्द भा.द.वि.कलम ३२६,३२३,३२४,५०४,५०६ सह कलम ३४ अन्वये शिक्षापात्र गुन्हा नोंद करणेत आला.

**३.** सदर गुन्ह्याचा तपास श्री. एस. ए. वगरे, पो.हे.कॉ.ब.क्र.१३२६, जत पोलीस ठाणे यांनी केला. त्यांनी आरोपीस अटक केली. गुन्हयामध्ये वापरणेत आलेला मुद्देमाल जप्त केला. साक्षीदारांचे जबाब नोंदविले. घटनास्थळ कम मुद्देमाल जप्तीचा पंचनामा केला. जखमीचे वैदयकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. चौकशीअंती आरोपींनी गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपी विरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. निशाणी क्र.१५ कडे भा.द.वि.कलम ३२६,३२३,५०४ सह कलम ३४ अन्वये आरोपीवर दोषारोप ठेवणेत आला. आरोपींनी गुन्हा कबूल नसल्याचे सांगून खटला पुढे चालविण्याची संमत्ती दर्शविली. गुन्हयामध्ये गोवविण्याइतपत पुरावा न आल्याने आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता ३१३(१)(ब) अन्वये निवेदन नोंदविणेत आले नाही.

**४.** प्रस्तुत प्रकरणातील सारांश तसेच अभिलेखावर दाखल पुरावा व कागदपत्रे तसेच दोन्ही वकीलांचा युक्तीवाद यांचा विचार करता खालील मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्दयावरील निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे दिले आहेत−

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दिनांक ०१.११.२०१८ रोजी सकाळी ०७.३० वा. चे सुमारास फिर्यादी यांचे मौजे येळदरी येथील शेत जमीन गट क्र.३१५ मध्ये आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीस | नाही. |

| | | |
|---|---|---|
| | कुऱ्हाडीने व काठीने मारहाण करुन इच्छापुर्वक जबर दुखापत पोहोचवली आणि त्यायोगे भा.द.वि. कलम ३२६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय? | |
| २. | वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन फिर्यादी व साक्षीदार यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण मारहाण केली आणि त्यायोगे भा.द.वि. कलम ३२३ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय? | नाही. |
| ३. | वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन फिर्यादी यांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून त्यांचा अपमान करून ते सार्वजनिक शांततेचा भंग करतील असे प्रक्षोभन दिले आणि त्यायोगे भा.द.वि. कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय? | नाही. |
| ४. | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>कारणमिमांसा</u>

**५.** अभियोग पक्षाने आरोपी विरुध्द गुन्हा शाबीत करण्याच्या दृष्टीने प्रत्यक्षदर्शी जखमी साक्षीदार फिर्यादी बाळगोंडा भुताळी कोळी व त्यांचे भाउ बसगोंडा भुताळी कोळी यांना तपासलेले आहे.

**<u>विचाराधीन बाबी क्र.१ ते ३ बाबत</u>:–**

**६.** विचाराधीन बाबी क्र.१ ते ३ या एकमेकांशी निगडीत असल्याने व समान पुराव्यावरच अवलंबून असल्याने उपलब्ध असलेल्या पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी

तिन्ही विचाराधीन बाबींचे विवेचन एकत्रीत केलेले आहे.

७. आरोपी विरुध्द गुन्हा शाबीतीकरिता अभियोग पक्षाने जखमी प्रत्यक्षदर्शी साक्षीदार फिर्यादी बाळगोंडा यांना नि.३२ कडे तपासलेले आहे. त्यांच्या साक्षीपुराव्याचे अवलोकन केले असता त्यांनी असे कथन केले की, सन २०१८ मध्ये ते शेतीची कामे करीत होते. त्यांच्या शेतलगत आरोपींची शेती आहे. ते चारा जमा करत होते. आरोपींनी त्यांना चाऱ्याची मागणी केली. फिर्यादींनी त्यास नकार दिला. त्यामुळे, त्यांच्यामध्ये वादावादी झाली. त्यामुळे, त्यांनी पोलीस ठाणेत तक्रार दिली होती. फिर्याद वर त्यांची सही आहे. तथापी, त्यातील मजकूर त्यांना माहीत नाही. आरोपींनी संगनमत करुन त्यांच्या उजव्या डोळयावर व हाताच्या बोटावर कुऱ्हाडीने व काठीने मारहाण करुन त्यांना गंभीर दुखापत केली होती असे काही घडले नसल्याचे त्यांनी कथन केले. अशाप्रकारे साक्षीदारास घटनेसंदर्भात काहीएक सांगता आले नसल्याचे दिसून येते. त्यामुळे, सदर साक्षीदाराला अभियोग पक्षातर्फे फितूर घोषीत करुन त्याचा विस्तृत उलटतपास घेतला. परंतु, अभियोग पक्षास मदत होईल असा कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर आलेला नाही. याउलट, आरोपी व त्यांच्यामध्ये तडजोड झाल्याची वस्तुस्थिती फिर्यादी यांनी उलटतपासादरम्यान मान्य केलेली आहे.

८. सा.क्र.२ बसगोंडा जो की फिर्यादी यांचा भाउ आहे त्याला अभियोग पक्षातर्फे नि.३३ कडे तपासणेत आलेले आहे. त्यांनी देखील सबळ पुरावा अभिलेखावर आणणेकरिता अभियोग पक्षास मदत केलेली नाही.

९. प्रस्तुत केसमधील फिर्यादी व आरोपी यांनी नि.क्र.३० कडे अर्ज सादर करुन त्यांच्यामध्ये तडजोड झाल्याचे कथन केले. परंतु भा.द.वि.कलम ३२६ हा गुन्हा तडजोड पात्र नसलेने सदरचा अर्ज नामंजूर करणेत आला. फिर्यादी व आरोपी यांची संयुक्त तडजोड पुरशिस नि.३१ कडे दाखल आहे.

१०. एकंदरीत अभियोग पक्षातर्फे अभिलेखावर आलेला पुरावा विचारात घेता,

ज्या व्यक्तीला मारहाण केल्यामुळे दुखापत झालेली आहे ती व्यक्तीच जर आरोपी विरुध्द न्यायालयामध्ये काहीही सांगत नसेल तर फिर्याद भारतीय पुरावा कायदयाप्रमाणे शाबीत झाली असे म्हणता येणार नाही. तसेच अभियोग पक्षातर्फे अभिलेखावर जखमीचे वैदयकीय प्रमाणपत्र दाखल करण्यात आलेले आहे. तथापी, सदर प्रमाणपत्रामध्ये नमूद करणेत आलेल्या जखमा या आरोपींच्या मारहाणीमुळे झाल्या ही बाब शाबीत झालेली नाही. फिर्यादी यांनी अभियोग पक्षास सबळ पुरावा अभिलेखावर आणणेकरिता कोणत्याही प्रकारे सहाय्य केलेले नाही. त्यामुळे, फिर्यादी व साक्षीदार यांना केलेल्या शिवीगाळ, दमदाटी व मारहाणीची जबाबदारी आरोपीवर टाकता येवू शकत नाही.

**११.** एकंदरीत वरील सर्व विवेचनावरुन असे दिसते की, आरोपीवर भा.द.वि.कलम ३२६,३२३,५०४ सह कलम ३४ अन्वये निश्चित करण्यात आलेले दोषारोप हे अभियोग पक्ष यांना संशयापलीकडे शाबीत करण्यास अपयश आलेले आहे. तसेच आरोपी विरुध्द कोणताही प्रत्यक्षदर्शी किंवा परिस्थितीजन्य पुरावा अभिलेखावर आलेला नाही. सदरची बाब विचारात घेता, आरोपी हे पुरेशा पुराव्या अभावी निर्दोष मुक्ततेस पात्र ठरतात. म्हणून, मी विचाराधीन बाब क्र.१ ते ३ ची उत्तरे नकारार्थी नोंदवून विचाराधीन बाब क्र.४ करिता खालीप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

**१.** आरोपी क्र.१ राजु मारुती कोळी, आरोपी क्र.२ अनिल मारुती कोळी, आरोपी क्र.३ सोमान्ना मारुती कोळी यांची फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम ३२६,३२३,५०४ या गुन्हयातून निर्दोष मुक्तता करणेत येत आहे.

**२.** जप्त करण्यात आलेली कळकाची काठी मुल्यहिन असल्यामुळे ती आव्हान कालावधीनंतर फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४५२ अन्वये नष्ट करणेत यावी.

**३.** जप्त करण्यात आलेल्या लोखंडी कुऱ्हाडीची अपील कालावधीनंतर जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम सरकार जमा करणेत यावी.

**४.** आरोपींचा जामीन कदबा रद्द करणेत येत आहे.

**५.** फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) चे तरतुदीची पुर्तता करणेसाठी आरोपींनी दिलेले रुपये १५,०००/- चे बंधपत्र व जामीनपत्र पुढील सहा महिन्याचे कालावधीकरिता अस्तित्वात राहिल.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयामध्ये पारित करणेत आला.)

PRAKASH CHUNNI BACHHALE

Digitally signed by PRAKASH CHUNNI BACHHALE
Date: 2026.03.10 13:04:36 +0530

दिनांक –०७.०३.२०२६
जत.

**(प्रकाश चु. बछले)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, जत.

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer. | : | R. B. Samalewale, Grade-3 |
| Court. | : | C.J.J.D. & J.M.F.C., Jath |
| Date | : | 07.03.2026 |
| the Presiding Officer on. | : | 10.03.2026 |
| Order uploaded on. | : | 10.03.2026 |